**प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हिरालाल सोनावणे यांच्या हस्ते अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना कार्ड वाटप***

**ठाणे दि ०५ मार्च** : प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजनेचे जिल्ह्यास्तरीय उद्‌घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हिरालाल सोनावणे यांच्या हस्ते आज येथे झाले. जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात प्रातिनिधिक स्वरुपात अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना योजनेचे कार्ड वापट करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना सोनवणे म्हणाले, आता वृद्‌धत्वाची काळजी नाही, या योजनेमुळे वयाची साठी पार केल्या नंतर आर्थिक आधार मिळेल त्यामुळे जिल्ह्यातील जास्तीत असंघटीत कामगारांनी प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमा दरम्यान प्रधानमंत्री महोदयांचा लाईव्ह कार्यक्रम पाहण्याची  व्यवस्था करण्यात आली होती.

यावेळी प्रकल्प संचालक डॉ. रुपाली सातपुते, महिला बाल विकास विभागाचे कोकण उप आयुक्त राहुल मोरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी गीता नागर, महिला व बाल विकास अधिकारी संतोष भोसले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनिष रेन्घे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी  ( स्वच्छता व पाणी ) छायादेवी शिसोदे , जिल्हा महिला बाल विकास अधिकारी प्रताप पाटील, आदि अधिकारी उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमास मोठ्या संख्येने अंगणवाडी सेविका,

मदतनीस, कार्यकर्त्या, आशा वर्कर्स उपस्थित होत्या.

